| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना / ०६ /२०२५ दि. ०८/०१/२०२५

**–:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–**

**ज्याअर्थी,** ठाणे शहरातील वागळे वाहतुक उपविभाग, हददीत उपवन येथे **"संस्कृती आर्ट फेस्टीवल (उपवन)"** या कार्यक्रमाचे दि. १०/०१/२०२५ ते १३/०१/२०२५ पर्यत आयोजन करण्यात येणार आहे. येऊर गेट कडुन पयलादेवी मंदिराकडे जाणा–या रस्त्याचे कडेला दोन्ही बाजुस २०० स्टॉल (3x3) उभारण्यात येणार आहेत. कार्यक्रमाकरीता मोठया प्रमाणात नागरीक उपस्थित राहत असतात. सदर कार्यक्रमामुळे वाहतुक कोंडी होवु नये या करिता वाहनांची वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असुन सदर परिसरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चीत रहावी याकरीता, आम जनतेच्या सोयीसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद** :– १) वर्तकनगर – शास्त्रीनगर – देवदयानगर – गांधीनगर, कापुरबावडी कडुन तसेच पवारनगर कडुन उपवन तलावाकडे जाणाऱ्या ( गणेश मुर्ती असलेले वाहन वगळुन ) सर्व प्रकारच्या वाहनांना **बिरसामुंडा चौक** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– अ) वर्तकनगर – शास्त्रीनगर – देवदयानगर – गांधीनगर, कापुरबावडी कडुन तसेच पवारनगर कडुन उपवन तलावाकडे जाणाऱ्या वाहनांना बिरसामुंडा चौक येथुन उजवीकडे वळुन पवारनगरकडे जाणाऱ्या रोडने द केव ट्रक बाजुस असलेल्या AESSEN PVT LTD GATE NO 18 येथुन डावीकडे वळुन सरळ पुढे गावंडबाग येथुन पुढे इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग** :– ब) गांधीनगर – कापुरबावडी व पवारनगर कडुन उपवंन तलाव मार्गे येऊरकडे जाणारी सर्व वाहने ही बिरसामुंडा चौकातुन डावीकडे वळुन सरळ जावुन देवदयानगर चौकातुन उजवीकडे वळुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** :– २) गावंडबाग परीसरातील सर्व सोसायटी व कोकणीपाडा नं.१, उपवन, ठाणे पश्चिम येथील सर्व प्रकारच्या वाहनांना लोटस सोसायटी, मेन गेट समोरील गावंड बाग येथील **सार्वजनिक शौचालय ठामपा** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– गावंडबाग परीसरातील सर्व सोसायटी व कोकणीपाडा नं.१ येथील सर्व प्रकारची वाहतूक ही निलगिरी सोसायटी, कॉर्नर आशापुरा – नवजिवन मेडीकल येथुन डावीकडे वळुन पुढे गावंड बंगला – सुर्या – गुलमोहर सोसायटी, द केव ट्रक बाजुस असलेल्या AESSEN PVT LTD GATE NO 18 येथुन पवारनगर रोडवरुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** :– ३) येऊर गेट कडुन उपवन पयलादेवी मंदिराकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **येऊर गेट** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– येऊर गेट कडुन उपवन तलावाकडे जाणारी वाहने ही शिवाईनगर – देवदयानगर कट येथुन डावीकडे वळुन निळकंठ सोसायटी – बिरसामुंडा चौक येथुन इच्छित स्थळी जातील.

**नो पार्कींग** :– येऊर गेट ते देवदयानगर चौक पर्यंत रोडच्या दोनही बाजुस **" नो पार्किंग "** करण्यात येत आहे.

**नो पार्कींग** :– पयलादेवी मंदिर ते बिरसामुंडा चौक पर्यंत रोडच्या दोनही बाजुस **" नो पार्किंग "** करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना हि **दि. १०/०१/२०२५ ते १३/०१/२०२५ रोजी दुपारी १४:०० ते रात्रौ ००:०० वा.** पावेतो अंमलात राहील.

सदरची अधिसुचना ही फायरब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय,ठाणे

२/– सदरची अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर</u>

– जिल्हाधिकारी, ठाणे

– आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

– अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.

– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

– पोलीस उप आयुक्त,परिमंडळ–५, ठाणे.

– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

– परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका ,ठाणे.

– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.

– नियंत्रण कक्ष,ठाणे शहर

– ठाणे पोलीस पत्रक

<u>प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.</u>

स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि वागळे, नौपाडा, वाहतूक उपविभाग.

CamScanner


Gawand Lawns
Siddhachal Phase 6
Lotus Upvan
लोटस उपवन
Upvan Lake Garden
SIDDHACH
HOUSING SOCIET 1
Overhead Tank
Siddhachal Clubhous
any Hospital
mbay Duck Family Restaurant and Bar
Upvan Lake, Thane
उपवन तलाव ठाणे
Skyline the te ce cafe
Little Flower High School, Thane
DEVIDAYA SOCIETY
19 AUTOMOTIVE
Millitary Ground
Salt N Pepper Restaurant & Bar
Public Food Shelter
N.G Vihar
एन.जी विहार
MRR Children's Hospital
Sai Baba T

CamScanner